आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ मे २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्रसरकार विविध देशांमध्ये बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळ पाठवणार

- अमेरिकेबरोबर सध्या सुरु असलेल्या व्यापार विषयक वाटाघाटी गुंतागुंतीच्या असून, त्याला अंतिम स्वरूप मिळायला वेळ लागेल असं परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांचं प्रतिपादन

- आयएसआय दहशतवादी संघटनेतल्या स्लीपर मॉड्यूल च्या दोन सदस्यांना मुंबई विमानतळावर अटक

- एका आठवड्यानंतर आयपीएल क्रिकेट स्पर्धा पुन्हा सुरू / बेंगळुरू मधे रंगणार रॉयल चॅलेंजर्स विरुद्ध कोलकाता नाईटरायडर्स मधला सामना

**आणि**

- दोहा डायमंड लीगमध्ये पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत भारताच्या नीरज चोप्राला रौप्यपदक

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्रसरकार विविध देशांमध्ये बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळ पाठवणार आहे. या महिन्याच्या अखेरीला सात सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्यांसह प्रमुख भागीदार देशांना भेट देतील. या प्रतिनिधी मंडळात विविध राजकीय पक्षांचे खासदार, प्रमुख राजकीय व्यक्तिमत्व आणि प्रतिष्ठित राजनैतिक अधिकाऱ्यांचा समावेश असेल. ही

सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं दहशतवादाविरोधातला भारताचा शून्य सहिष्णुता दृष्टिकोन जगासमोर मांडतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. राजकीय मतभेदांच्या पलीकडे, राष्ट्रीय एकतेचं हे शक्तिशाली प्रतीक असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारतीय सेनादलांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात ठिकठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. भारतीय जनता पार्टीतर्फे आज छत्तीसगड, आणि उत्तरप्रदेशात तिरंगा यात्रा काढण्यात आली. महाराष्ट्रातही जनसामान्यांमधे ऑपरेशन सिंदूर बद्द्ल अभिमान आणि गौरवाची भावना व्यक्त होत आहे. भंडारा जिल्ह्यातल्या एका नागरिकांनी आपली प्रतिक्रीया दिली....

**होल्ड- बाईट-**

माजी सेनाधिकारी लेफ्टनंट जनरल कंवलजीत सिंग धिल्लाँ यांनी सेनादलांचं अभिनंदन केलं आहे. दहशतवाद्यांना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवणं गरजेच असल्याचं मत त्यांनी आकाशवाणी प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केलं.

**<><><><><>**

अमेरिकेबरोबर सध्या सुरु असलेल्या व्यापार विषयक वाटाघाटी गुंतागुंतीच्या असून, त्याला अंतिम स्वरूप मिळायला वेळ लागेल, असं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. भारतानं अमेरिकन वस्तूंवरचे सर्व कर रद्द करण्याची तयारी दर्शवल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका मुलाखतीत केला होता, त्या पार्श्वभूमीवर जयशंकर यांनी  बातमीदारांशी बोलताना हा खुलासा केला. भारत-अमेरिका व्यापार करार दोन्ही देशांसाठी फायद्याचा आणि व्यवहार्य

ठरायला हवा, असं ते यावेळी म्हणाले. सध्या कोणत्याही देशाबरोबर व्यापार करार करण्याचं आपलं नियोजन नाही, असं ट्रम्प यांनी या मुलाखतीत म्हटलं होतं.

**<><><><><>**

एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं आयएसआय या बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटनेच्या स्लीपर मॉड्यूल च्या दोन सदस्यांना अटक केली आहे. २०२३ साली महाराष्ट्रात पुणे इथं आयईडी ही स्फोटकं बनवणं आणि त्याची चाचणी केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. एनआयए नं त्यांना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक केली असून, ते इंडोनेशियाच्या जकार्ता इथून परतले होते. हे दोन्ही आरोपी गेली दोन वर्ष फरार होते आणि एनआयएच्या मुंबईतल्या विशेष न्यायालयानं त्यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंटही जारी केलं होतं. दोन्ही आरोपींची माहिती देणाऱ्यांना एनआयएनं प्रत्येकी ३ लाख रुपयांचं रोख बक्षीस जाहीर केलं होतं. या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचं एनआयए च्या सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

आधार क्रमांकानं प्रमाणित केलेल्या देशभरातल्या आतापर्यंतच्या व्यवहारांची संख्या १५० अब्जांहून अधिक झाली असून हा आधार परिसंस्थेसाठी एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं एका पत्रकात म्हटलं आहे. या वर्षी एप्रिल महिन्यात २१० कोटी आधार प्रमाणित व्यवहार झाले असून गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत ते ८ टक्क्यांनी वाढले असल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त आज देशात विविध ठिकाणी आरोग्य शिबिरांचं आयोजन केलं जात आहे. उच्च रक्तदाब आणि त्याचे विविध अवयवांवर होणारे

दुष्परिणाम तसंच उच्च रक्तदाबाच्या प्रतिबंधक उपायांबाबत जागरूकता वाढवण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. 'तुमचा रक्तदाब अचूकपणे मोजा, तो नियंत्रित करा आणि दीर्घायुषी व्हा' ही या वर्षीची संकल्पना आहे.

<><><><>

एका आठवड्यानंतर आज पुन्हा आयपीएल क्रिकेट स्पर्धा सुरू होत आहे. आज, यजमान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील सामना बंगळुरूमध्ये चिन्नास्वामी स्टेडियम इथं संध्याकाळी साडेसात वाजता होईल.

यापूर्वी, भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळं नऊ मे रोजी आयपीएल स्पर्धा स्थगित करण्यात आली होती. उर्वरित सामन्यांचं नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. मोहाली आणि धरमशाला इथं आता सामने होणार नाहीत. २५ मे रोजी होणारा अंतिम सामना आता ३ जून रोजी होणार आहे. प्लेऑफ सामन्याची ठिकाणं यथावकाश जाहीर होतील.

<><><><>

दोहा डायमंड लीगमध्ये पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत भारताच्या नीरज चोप्रानं दुसरे स्थान पटकावलं. त्यानं ९० पूर्णांक २३ मीटरच्या विक्रमी अंतरापर्यंत भालाफेक करण्यात यश मिळवलं. जर्मनीच्या ज्युलियन वेबरनं ९१ पुर्णांक ६ शतांश मीटर अंतरावर फेक करत पहिलं स्थान पटकावलं. नीरजनं त्याच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच ९० मीटरचा टप्पा ओलांडला. ९० मीटरचा टप्पा पार केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नीरज चोप्राचं अभिनंदन केलं आहे. ही सर्वोत्तम कामगिरी नीरजचं समर्पण, शिस्त आणि खेळाप्रति प्रेमाचा परिणाम असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, याच स्पर्धेत भारताच्या पारुल चौधरीनं महिलांच्या तीन हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात सहावं स्थान पटकावलं.

<><><><>

इटालियन खुल्या टेनिस स्पर्धेत यानिक सिनर याने काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात अमेरिकेच्या टॉमी पॉलचा पराभव करत या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात त्याची लढत स्पेनच्या कार्लोस अल्कराझ याच्याशी होईल. सिनरने इटालियन खुली टेनिस स्पर्धा जिंकली, तर स्पर्धा जिंकणारा तो दुसरा इटालियन खेळाडू ठरेल.

<><><><>

मुंबईत वानखेडे मैदानावर क्रिकेटपटू रोहित शर्मा याच्या नावानं उभारण्यात आलेल्या स्टॅण्डचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल झालं. एखादा क्रिकेटपटू खेळत असतानाच त्याचं नाव मैदानातल्या स्टँडला देण्याचा हा ‘वानखेडे मैदानाच्या इतिहासातला पहिलाच क्षण असल्याचं सांगत, मुख्यमंत्र्यांनी रोहित शर्माच्या कामगिरीचं कौतुक केलं. मुंबई क्रिकेट संघटनेने एक लाख प्रेक्षक क्षमतेचं भव्य क्रिकेट मैदान उभारावं, संघटनेनं प्रस्ताव दिला, तर मैदानासाठी जागा उपलब्ध करून देण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

<><><><>

युक्रेनच्या ईशान्य भागात रशियानं केलेल्या ड्रोन हल्ल्यात एका प्रवासी बसमधले ९ जण ठार झाले. या हल्ल्यात बिलोपिलिया शहरातले ४ नागरिक जखमी झाल्याचं स्थानिक लष्करी सूत्रांनी सांगितलं. २०२२ सालानंतर रशिया आणि युक्रेनमध्ये पहिल्यांदाच थेट चर्चा झाल्यानंतर काही तासांमध्येच हा हल्ला झाला. या चर्चेत कोणताही तोडगा निघाला नाही, मात्र येत्या काही दिवसांमध्ये दोन्ही बाजू परस्परांना एक हजार युद्धकैदी परत करतील, यावर एकमत झालं.

**<><><><><>**

ईशान्य भारतात पुढले सात दिवस मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता असून अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालय मध्ये आज जोरदार ते अती जोरदार पाऊस पडेल, तर आंध्रप्रदेशची किनारपट्टी, कर्नाटक, केरळ, माहे, तामिळनाडू, पुद्दुचेरी, करैकल आणि तेलंगणात आज जोरदार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, जम्मू-काश्मीर आणि नैर्ऋत्य उत्तर प्रदेशाच्या काही भागात आज उष्णतेची लाट राहील. बिहार आणि ओदिशामध्ये उष्ण आणि दमट हवामान राहील, तर पश्चिम राजस्थानमध्ये काही ठिकाणी धुळीचं वादळं येईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. मुंबईत आज सकाळपासून ढगाळ वातावरण असून, शहर आणि उपनगरांमध्ये पावसाच्या हलक्या सरी पडल्या.

**//<><><><><>//**